# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ०५ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक २२/०१/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२२/०१/२०१९ मंगळवार सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवान मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवान मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| ढेकळे सदाशिव गणपत | सनकत चेतन गणेश |
| बेंडाळे उज्वला मोहन | पाटील प्रतिभा सुधिर |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णू रामदास |
| पोकळे दिलिप बबनराव | बरडे नितीन मनोहर |
| खडके सुनिल वामनराव | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | |

सदर सभेस, मा.आयुक्त,श्री.चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त,श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे उपस्थित होते.

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सभेला सुरुवात करणेत येत आहे.

**नगरसचिव:- विषय क्र. १)** दि.०८/०१/२०१९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**श्री.सुनिल खडके :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की दि.०८/०१/२०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** दैनंदिन बाजार वसुली / आठवडे बाजार वसुली / कोंबडीबाजार वसुली शुल्क मक्त्या कामी मक्तेदार यांनी दिलेली देकार रक्कम रु.१,४०,११,१११/- मात्र मान्य करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सुनिल खडके :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, अभिकर्त्यास म.न.पा.च्या या प्रकारच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच शहरात हॉकर्सच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेता ऑफसेट प्राईज रुपये मात्र १,४१,००,०००/-(अक्षरी रुपये एक कोटी ऐक्केचाळीस लक्ष) मात्रची निश्चित करण्यात यावी तसेच देय असलेली रक्कम अदा न केल्यास दररोज रु.१०००/- (अक्षरी रुपये एकहजार मात्र) दंड राहिल अशी दंडाची रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) झाले नंतर सदर मक्ता रद्द करता येईल व सदरची निविदा ही दोन वर्षाच्या कालावधीसाठी काढण्यात यावी व पुढील वर्षी १०% इतकी वाढ करण्यांत यावी. या प्रकारच्या अटी शर्तीस अधिन राहून त्या प्रमाणे प्रशासनाने नविन फेर प्रस्ताव सादर करावा.

तो पावेतो दैनंदिन बाजार वसुली / आठवडे बाजार वसुली/ कोंबडी बाजर वसुली शुल्क बाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- १० प्रतिकुल मते :- ०४**
**सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** पाणी पुरवठा वाघुर रॉ वॉटर पंपींग स्टेशन येथील ४०० केव्हीए क्षमतेचा (३३केव्ही/४४० व्होल्ट) ट्रान्सफार्मर दुरुस्ती करणे बाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, पाणी पुरवठा वाघुर रॉ वॉटर पंपींग स्टेशन येथील ४०० केव्हीए क्षमतेचा (३३केव्ही/४४० व्होल्ट) ट्रान्सफार्मर दुरुस्ती करणे कामी मे.व्दारका ट्रान्सफार्मस् जळगांव उत्पादक तथा दुरुस्तीधारक यांचे ट्रान्सफार्मर दुरुस्ती कामाचे खर्च रु.३,२०,२९६/- जीएसटी दरासह प्रोफार्मा इन्वाईस प्राप्त झाले असुन दिलेले दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने व सदरचे काम अत्यावश्यक असलेने काम तात्काळ करुन घेणे उचित असल्याने मे.व्दारका ट्रान्सफार्मस् ३१/१ एमआयडीसी,जळगांव यांनी दिलेल्या प्रोफार्मा इनव्हाईस नुसार रक्कम रु. ३,२०,२९६/- मात्रच्या खर्चासह विना निविदा रोहीत्र दुरुस्तीचे व सर्व्हीसींगचे काम करुन घेणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२) (२) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२७/०८/२०१८ ते दि.०२/०९/२०१८, दि.०३/०९/२०१८ ते दि.०९/०९/२०१८, दि.१०/०९/२०१८ ते दि.१६/०९/२०१८, दि.१७/०९/२०१८ ते दि.३०/०९/२०१८, दि.०१/१०/२०१८ ते दि.२१/१०/२०१८, दि.२२/१०/२०१८ ते दि.०४/११/२०१८, दि.०५/११/२०१८ ते दि.११/११/२०१८, दि.१२/११/२०१८ ते दि.१८/११/२०१८ व दि.१९/११/२०१८ ते दि.२५/११/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२७/०८/२०१८ ते दि.०२/०९/२०१८, दि.०३/०९/२०१८ ते दि.०९/०९/२०१८, दि.१०/०९/२०१८ ते दि.१६/०९/२०१८, दि.१७/०९/२०१८ ते दि.३०/०९/२०१८, दि.०१/१०/२०१८ ते दि.२१/१०/२०१८, दि.२२/१०/२०१८ ते दि.०४/११/२०१८, दि.०५/११/२०१८ ते दि.११/११/२०१८, दि.१२/११/२०१८ ते दि.१८/११/२०१८ व दि.१९/११/२०१८ ते दि.२५/११/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- जादा विषय क्र. १)** २५ कोटी विशेष निधितुन जळगांव शहरातील पाचोरा रोडवरील डी.मार्ट ते ईच्छादेवी चौक पर्यतची विज वाहीनी स्थलांतरीत करणे बाबत (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, २५ कोटी विशेष निधितुन जळगांव शहरातील पाचोरा रोडवरील डी.मार्ट ते ईच्छादेवी चौक पर्यंतची विज वाहीनी स्थलांतरीत करण (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) कामी रक्कम रु.२५,८४,०४०/- मात्रला शासकीय योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.११८९ सन २०१८-१९ तीसऱ्यांदा मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास मा.आयुक्त सो यांची मिळालेली मान्यतेनुसार ई-निविदा मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन त्याबाबतची सुचना दै.दिव्य मराठी दि.१५/१२/२०१८ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

मुदतीअंती एकच ई-निविदा प्राप्त झाली. तीसऱ्यांदा ई-निविदा प्रसीध्द करण्यात आली असल्याने प्राप्त ई-निविदा ही म.निविदा समिती यांची मान्यता घेवून यांच्या समक्ष उघडण्यात आले त्यात सहभागी एक ई-निविदा धारकाने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने दि.०८/०१/२०१९ रोजी म.निविदा समिती यांच्या समक्ष मक्तेदाराचे दरा बाबतचे फोल्डर क्रं.२ उघडण्यात आले. आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ताय खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अंदाजीत रक्कम | मेगा सोल्युशन,भुसावळ |
|---|---|---|
| १ | रु.२५,८४,०४०.०० | अंदाजीत रक्कमेवर १८.९९% ने जास्त<br>२५,८४,०४०.००<br>+४,९०,७०९.००<br>३०,७४,७४९.०० |

वर नमुद तक्ता पाहता निविदाकार मेगा सोल्युशन,भुसावळ यांचे दर सर्वात कमीचे म्हणजे अंदाजीत रक्कमेवर १८.९९% दर आलेले आहेत. सदरचे दर जास्तचे वाटत असल्याने मक्तेदार यांना शहर अभियंता यांच्या समक्ष वाटाघाटीसाठी बोलवले असता त्यांनी म्हणजेच मक्तेदार यांनी निविदेत भरलेल्या दरामध्ये १४.५०% दर कमी करुन दिलेले आहे. निविदा रक्कमेवर ४.५०% जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शविली असुन प्रस्तूत कामी हे महावितरण मर्या.कंपनीच्या सुपर व्हिजन स्किम अंतर्गत करण्यात येत असुन कामाचे अंदाजपत्रक हे महावितरण कंपनी मर्या.कंपनीच्या जुन्या दरानुसार तथा सन २०१७-१८ च्या दरानुसार आहे. महावितरण कंपनी मर्या.कंपनीच्या नविन दरानुसार तथा २०१८-१९ च्या दरानुसार कामाची अंदाजपत्रकीय किम्मत हि निविदा अंदाजपत्रकीय किम्मतीपेक्षा ४.४२% ने जास्त आहे. मक्तेदाराने वाटाघाटी अंती प्रस्तृत काम ४.५०% जास्त दराने करण्याची तयारी दर्शविलेली असुन या दरानुसार येणारा अपेक्षीत खर्च रक्कम रु.२७,००,३२१/- मात्र हा महावितरण कंपनी मर्या.कंपनीच्या नविन दरानुसार तथा सन २०१८-१९ चे दरानुसार येणाऱ्या अंदाजपत्रकीय किम्मतीपेक्षा ०.३०% ने कमी आहे. हि बाब विचारात घेता मक्तेदाराचे दर वाजीवी व योग्य आहे.

प्रस्तावात नमूद केलेनूसार मक्तेदार मेगा सोल्युशन,भुसावळ यांनी निविदेत भरलेले दर/वाटाघाटी अंतीचे ४.५०% जास्तचे दर स्विकृत करणेस व या कामी येणाऱ्या पर्यायी एकुण रक्कम रु.२७,००,३२१/- मात्र चे खर्चास तसेच प्रशासकीय मान्यता मिळाल्यानुसार रक्कम रु.२५,८४,०४०/- मात्रचा खर्च विषेश निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.१,१६,२८१/- मात्रचा खर्च मनपा फंडातुन करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ संविधा ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- जादा विषय क्र. २)** २५ कोटी विशेष निधितुन जळगांव शहरातील खॉजामियॉ चौक (दर्गा) ते गणेश कॉलनी चौक पर्यंतची विज वाहीनी स्थलांतरीत करणे बाबत (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, २५ कोटी विशेष निधितुन जळगांव शहरातील खॉजामियॉ चौक (दर्गा) ते गणेश कॉलनी चौक पर्यंतची विज वाहीनी स्थलांतरीत करणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) कामी रक्कम रु.२५,५६,४२९/- मात्रला शासकीय योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.११९० सन २०१८-१९ तीसऱ्यांदा मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास मा.आयुक्त सो यांची मिळालेली मान्यतेनुसार ई-निविदा मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन त्याबाबतची सुचना दै.दिव्य मराठी दि.१५/१२/२०१८ रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती.

मुदतीअंती एकच ई-निविदा प्राप्त झाली. तीसऱ्यांदा ई-निविदा प्रसीध्द करण्यात आली असल्याने प्राप्त ई-निविदा ही म.निविदा समिती यांची मान्यता घेवून यांच्या समक्ष उघडण्यात आले त्यात सहभागी एक ई-निविदा धारकाने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने दि.०८/०१/२०१९ रोजी म.निविदा समिती यांच्या समक्ष मक्तेदाराचे दरा बाबतचे फोल्डर क्रं.२ उघडण्यात आले. आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अंदाजीत रक्कम | मेगा सोल्युशन,भुसावळ |
|---|---|---|
| १ | रु.२५,५६,४२९.०० | अंदाजीत रक्कमेवर १८.९९% ने जास्त<br>२५,५६,४२९.००<br>+४,८५,४६५.००<br>३०,९१,८९५.०० |

वर नमुद तक्ता पाहता निविदाकार मेगा सोल्युशन,भुसावळ यांचे दर सर्वात कमीचे म्हणजे अंदाजीत रक्कमेवर १८.९९% दर आलेले आहेत. सदरचे दर जास्तचे वाटत असल्याने मक्तेदार यांना शहर अभियंता यांच्या समक्ष वाटाघाटीसाठी बोलवले असता त्यांनी म्हणजेच मक्तेदार यांनी निविदेत भरलेल्या दरामध्ये १०.४९% दर कमी करुन दिलेले आहे. निविदा रक्कमेवर ८.५०% जास्त दराने काम करण्याची तयारी दर्शविली असुन प्रस्तूत कामी हे महावितरण मर्या.कंपनीच्या सुपर व्हिजन स्किम अंतर्गत करण्यात येत असुन कामाचे अंदाजपत्रक हे महावितरण कंपनी मर्या.कंपनीच्या जुनया दरानुसार तथा सन २०१७-१८ च्या दरानुसार आहे. महावितरण कंपनी मर्या.कंपनीच्या नविन दरानुसार तथा २०१८-१९ च्या दरानुसार कामाची अंदाजपत्रकीय किम्मत हि निविदा अंदाजपत्रकीय किम्मतीपेक्षा ११.६१% ने जास्त आहे. मक्तेदाराने वाटाघाटी अंती प्रस्तृत काम ८.५०% जास्त दराने करण्याची तयारी दर्शविलेली असुन या दरानुसार येणारा अपेक्षीत खर्च रक्कम रु.२७,७३,७२५/- मात्र हा महावितरण कंपनी

मर्या.कंपनीच्या नविन दरानुसार तथा सन २०१८-१९ चे दरानुसार येणाऱ्या अंदाजपत्रकीय किम्मतीपेक्षा २.७८% ने कमी आहे. हि बाब विचारात घेता मक्तेदाराचे दर वाजीवी व योग्य आहे.

प्रस्तावात नमूद केलेनूसार मक्तेदार मेगा सोल्युशन,भुसावळ यांनी निविदेत भरलेले दर/वाटाघाटी अंतीचे ८.५०% जास्तचे दर स्विकृत करणेस व या कामी येणाऱ्या पर्यायी एकुण रक्कम रु.२७,७३,७२५/- मात्र चे खर्चास तसेच प्रशासकीय मान्यता मिळाल्यानुसार रक्कम रु.२५,५६,४२९/- मात्रचा खर्च विषेश निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.२,१७,२९६/- मात्रचा खर्च मनपा फंडातुन करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ संविधा ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- जादा विषय क्र. ३)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१) प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२३/दि.१९/०१/२०१९ अन्वये (१) वार्ड क्रं.२३ व ५ अंतर्गत परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे तसेच अस्तित्वात असलेल्या पोलवर स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (२) वार्ड क्रं.६,४ अंतर्गत जैनाबाद,कांचन नगर,दिनकर नगर परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) , (३) वार्ड क्रं.१ व २ अंतर्गत शिवाजी नगर युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) कामी मक्तेदार महेश इलेक्ट्रीक वर्क्स,जळगांव यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.२१,६७,६३५/- मात्र खर्चाची संविंदा.

२) प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२४/दि.१९/०१/२०१९ अन्वये (१) वार्ड क्रं.१३ व १८ अंतर्गत पिंप्राळा गावठान,शामराव नगर, श्रीधर नगर, शाम नगर पिंप्राळा युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (२) वार्ड क्रं.१४,१८ अंतर्गत आझाद नगर, आशाबाबा यनगर, आसावा नगर पिंप्राळा युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (३) वार्ड क्रं.१३ अंतर्गत भैरव नगर, दिपक फुड, सेंट्रल बँक कॉलनी पिंप्राळा युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (४) वार्ड क्रं.१६ व १४ अंतर्गत गणपती नगर, पिंप्राळा घरकुल, हरीविठ्ठल बस स्टॉप पिंप्राळा युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (५) वार्ड क्रं.१४ अंतर्गत मयुर कॉलनी, शाम नगर, श्रीधर नगर, संत मिराबाई नगर पिंप्राळा युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), मक्तेदार महेश इलेक्ट्रीक वर्क्स,जळगांव यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.१२,०६,८२६/- मात्र खर्चाची संविंदा.

३) प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२५/दि.१९/०१/२०१९ अन्वये (१) वार्ड क्रं.३,४ व ८ अंतर्गत शिवाजी नगर युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), मक्तेदार महेश इलेक्ट्रीक वर्क्स,जळगांव यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.११,९९,५३०/- मात्र खर्चाची संविंदा.

४) प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२६/दि.१९/०१/२०१९ अन्वये जळगांव शहरातील खॉजामियॉ चौक (दर्गा) ते कोर्ट चौक पर्यंतची विज वाहीनी स्थलांतरीत करणे कामी (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), मक्तेदार मेगा सोल्युशन,भुसावळ यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.२१,७८,३३६/- मात्र खर्चाची संविंदा.

५) प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२७/दि.१९/०१/२०१९ अन्वये (१) वार्ड क्रं.११ अंतर्गत भोईटे नगर, मोतीमहाले चौक, एस.एम.आय.टी.रोड, रायसोनी शाळा रोड परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी

नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (२) वार्ड क्रं.५ अंतर्गत शारदा नगर, वृदांवन कॉलनी, काशीनाथ नगर जोशी पेठ युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (३) वार्ड क्रं.५ अंतर्गत गोपाळपुरा, तळेले कॉलनी नवि पेठ युनिट परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), मक्तेदार महेश इलेक्ट्रीक वर्क्स,जळगांव यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.१२,१९,६४०/- मात्र खर्चाची संविंदा.

६) प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२८/दि.१९/०१/२०१९ अन्वये (१) वार्ड क्रं.०५ अंतर्गत श्रावण नगर, अजिंठा चौक परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (२) वसंत दालमिल, मनिषा कॉलनी, शोभा अपार्टमेंट दौलत नगर परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (३) वार्ड क्रं.३७अंतर्गत रमेशदादा जैन बंगलो शेजारील शिरसोली रोड रायसोनी नगर परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (४) वार्ड क्रं.३४ अंतर्गत सुप्रिम कॉलनी, खुबचंद साहित्या नगर, श्रीकृष्ण नगर, इंद्रप्रस्थ कॉलनी (एम.आय.डी.सी.)परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) मक्तेदार महेश इलेक्ट्रीक वर्क्स,जळगांव यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.१८,१२,४३९/- मात्र खर्चाची संविंदा.

७) प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/२९/दि.१९/०१/२०१९ अन्वये (१) वार्ड क्रं.१० व १९ अंतर्गत गणेश कॉलनी परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (२) प्रताप नगर, परिसरासह एल.आय.सी.ऑफीस, टागोर नगर, रिमांडहोम परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (३) वार्ड क्रं.०९ अंतर्गत शाहु नगर परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (४) वार्ड क्रं.११ अंतर्गत निवृत्ती नगर, मुक्ताईनगर, हायवेदर्शन कॉलनी परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत) मक्तेदार महेश इलेक्ट्रीक वर्क्स,जळगांव यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.१८,१५,६०३/- मात्र खर्चाची संविंदा.

८) प्रशासकीय आदेश क्रं./विदयुत/३०/दि.१९/०१/२०१९ अन्वये (१) वार्ड क्रं.१३अंतर्गत आसावा नगर,सेंट्रल बँक कॉलनी, आशाबाबा नगर परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), (२) वार्ड क्र.१६ अंतर्गत हरिविठ्ठल बस स्टॉप, खंडेराव नगर, मयुर कॉलनी, पिंप्राळा परिसरासह ठिकठिकाणी पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी नवीन पोलची उभारणी करणे.स्ट्रीट लाईट फेज ओढणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन अंतर्गत), मक्तेदार महेश इलेक्ट्रीक वर्क्स,जळगांव यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.१३,०३,६९३/- मात्र खर्चाची संविंदा.

९) प्रशासकीय आदेश क्रं./सा.बां./११७/दि.१८/०१/२०१९ अन्वये महराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना अंतर्गत प्रभाग क्रं.३२ मेहरुण परिसरात स.नं.०९ जवळील नाल्यावरील पुलास अप्रोच रस्ता बांधणेकामी मक्तेदार श्री.हेमंत अरुण नाईक यांचे वाटाघाटीअंतीचे दर स्विकारुन रक्कम रु.१६,०९,०२१/- मात्र खर्चाची संविंदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**नगरसचिव:- आयत्यावेळेचा विषय क्र. १)** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत सेंट टेरेसा हायस्कुल ते सिध्दार्थ नगर पर्यंत मेहरुण तलाव सभोवतालचा ९.०० मी.रुंद रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दरास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत सेंट टेरेसा हायस्कुल ते सिध्दार्थ नगर पर्यंत मेहरुण तलाव सभोवतालचा ९.०० मी.रुंद रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी रस्ता अनुदान अंतर्गत म.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कडील पत्र क्र.नपप्र/जमनपा/विरअनु/कायार/२/१/१६२/२०१८ दि.१४/०३/२०१८ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार म.आयुक्त मनपा यांचे दि.२२/०३/२०१८ चे मान्यतेनुसार मनपा संकेत

स्थळावर ई निविदा प्रसिध्द करुन ई निविदा दर मागविण्यात आले त्यात खाली नमुद प्रमाणे तिन मक्तेदार यांचे ई निविदा दर प्राप्त झाले.

| **निविदा धारकाचे नांव** | **श्री.शिवाजी गणपत भंगाळे,जळगांव** | **शिवशक्ती कन्स्ट्रक्शन,जळगांव** | **एस.एस.पाटील कन्स्ट्रक्शन प्रा.लि.पाचोरा** |
|---|---|---|---|
| निविदा रक्कम रु.३४२४९०५६/- | निविदा रक्कमेपेक्षा ८.१५% कमीचे दराने | निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दराने | निविदा रक्कमेपेक्षा ०.००१% जास्तीचे दराने |
| | ३१४५७७५७.००/- | ३०८२४१५०.००/- | ३४२४९३९८.००/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवशक्ती कन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु. ३०८२४१५०.००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु. ३०८२४१५०.००/- मात्र विशेष रस्ता अनुदान रक्कम रु.३.७५ कोटी अंतर्गतच्या निधीतुन खर्च करावयाचा आहे. त्यानुसार मक्तेदार शिवशक्ती कन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रक्कमेवर १०% कमीचे दरास मा.स्थायी समिती सभेची मान्यता करीता प्रशासकीय डॉकेट क्र.साबा.५३८ दि.३१/०८/२०१८ अन्वये विशेष रस्ता अनुदान रक्कम रु.३०७५ कोटी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत सेंट टेरेसा ते सिध्दार्थ नगर पर्यंत मेहरुण तलाव सभोवतालचा ९.०० मी.रुंद रस्त्याचे डांबरीकरण करणे कामाचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आलेला होता. महासभा ठराव क्र.६६ दि.०७/१२/२०१८ अन्वये वरील प्रस्तावातील काम रद्द करुन नव्याने ०७ कामांचा समावेश करणे बाबत अशासकीय प्रस्ताव मान्य करण्यात आला होता. मात्र प्रस्तावीत कामाचे निविदा धारक हे न्यायालयात जाण्याची शक्यता विचारात घेता तसेच प्राप्त अनुदान लवकर खर्च करणे आवश्यक असल्याने महासभा ठराव क्र.६६ दि.०७/१२/२०१८ शासनास विखंडीत करण्याकामी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्यामुळे वरील प्रस्तावीत कामी आलेले दरास मंजुरी देण्यात येत असुन मक्तेदारा सोबत संविदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- खडके सुनिल वामनराव**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**